पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या विनंती बदलासाठी (Change Request) व इतर कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-०८१५/प्र.क्र.२७/भाग-३/पोल-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : २६ मार्च, २०१८

वाचा :

१) शासनाचे क्रमांक आयएसएस-१०१२/प्र.क्र.७१/विशा-४, दि.१७.९.२०१३ चे इरादा पत्र (Letter of Intent)
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र. आयएसएस-१०१२/प्र.क्र.७१/विशा-४, दि.१४.१०.२०१३
३) महाराष्ट्र शासन आणि मे.अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. यांचे दरम्यान दि.२८.१०.२०१३ रोजी झालेला करारनामा.
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५
५) शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७
६) मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय शक्ती प्रदान समितीच्या दि.१७.१.२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
७) पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या अध्यक्षतेखालील दि.२८.०६.२०१७ रोजीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) बैठकीचे इतिवृत्त.
८) मे.एडीएसएल कंपनीने दि.२९.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेली देयके.
९) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.४.१०.२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
१०) मे. प्राईसवॉटरहाऊस कूपर्स कं. यांचा दि. ०५.१२.२०१७ रोजीचा ई-मेल.

प्रस्तावना :-

पोलीस आयुक्त, पुणे यांचे अधिनस्त पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्याबाबत मे.अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. कंपनीला दि. १७.९.२०१३ रोजी इरादापत्र (Letter of Intent) देण्यात आले होते. संदर्भाधीन क्र. २ येथे नमुद गृह विभाग, शासन निर्णय दि.१४.१०.२०१३ अन्वये सदर प्रकल्पास व त्यासाठी येणाऱ्या संभाव्य रु.२२५ कोटी (रुपये दोनशे पंचवीस कोटी फक्त) इतक्या रक्कमेच्या खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र.३ येथे नमुद करारनाम्यानुसार सदरहू कंपनीला देय असणारी रक्कम

एकरकमी देय न करता, पुढील ६ वर्षाच्या कालावधीमध्ये (म्हणजेच प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर २०% आणि उर्वरित ८०% रक्कम २० समान हप्त्यामध्ये) अदा करणे बंधनकारक आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाचे काम पुर्ण झाले असुन सदर प्रकल्प दि.२७.१०.२०१५ रोजी कार्यान्वित (Go-Live) झाला आहे. पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या अतिरिक्त कामाबाबत/Change Request बाबत (अतिरिक्त खांब उभारणे, खांब स्थलांतरित करणे, पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही कॅमेरांचे एकात्मिकरण करणे व पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही व्हीवींग सेंटर स्थलांतरित करणे इत्यादीबाबत) या कामांची देयके प्रकल्प संचालक (SI) मे.एडीएसएल कंपनीने सादर केली असून ती अदा करण्याची विनंती दि.२९.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये केली आहे. पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या अतिरिक्त कामाबाबत/Change Request बाबत पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या अध्यक्षतेखालील दि.२८.०६.२०१७ रोजीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) बैठकीत तसेच अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदान समितीच्या दिनांक १७.०१.२०१७ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार प्रकल्प अंमलबजावणी समितीस (PIC) रु.५० लाखापर्यंतच्या मर्यादेत अतिरिक्त कामाबाबत/Change Request बाबत निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. तथापि उपरोक्तप्रमाणे नमूद कामे/Change Request ही पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या कामाच्या व्याप्तीबाहेरची कामे असल्याने सदर कामांना प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या Change Request/अतिरिक्त कामाबाबत (अतिरिक्त खांब उभारणे, खांब स्थलांतरित करणे, पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही कॅमेरांचे एकात्मिकरण करणे व पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही व्हीवींग सेंटर स्थलांतरित करणे

इत्यादी) एकूण रुपये ६४,३३,६३२/-(रु.चौसष्ट लाख तेहतीस हजार सहाशे बत्तीस) एवढया खर्चाच्या खालील तक्त्यात नमूद कामांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

Change Requests / New Deliverables	**Analyzed Price**	**Price with $ Escalation for imported items**	**PIC Comments**	**HPC Approvals**
Pole & Junction Cabinet Shifting (CR)	Rs.16,84,814/-	--	Approved	Rs.16,84,814/-
Police Station Viewing Centre Shifting (CR)	Rs.33,865/-	--	Approved	Rs.33,865/-
Additional Poles deployment (ND)	Rs.37,00,509/-	Rs.37,91,862/-	In principal Approved for Rs.37.91 Lac	Rs.37,00,509/-
CCTV cameras inside Police station integration with Control Room (With 3 yrs. support) (ND)	Rs.10,14,444/- (Part payment out of total approx. 14.49 Lac)	-----	Approved	Rs.10,14,444/-
		Total		**Rs.64,33,632/-**

२. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च हा "मागणी क्र. बी-१०, ४०५५- पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही संनियंत्रण यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) योजनेतर योजना - ५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदान समितीच्या दिनांक १७.०१.२०१७ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार व अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या बैठकीतील मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२७१८१६२४४५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2018.03.27 18:22:25 +05'30'

(कैलास गायकवाड)
उपसचिव, गृह विभाग

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र ½, मुंबई/नागपूर
१०.आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.
११. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे.
१२.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१३. मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि., प्रिमाईसेस नं. १३-ए, १३ वा मजला, अर्नेस्ट हाऊस, बॅकबे रेक्लेमेशन, एनसीपीए रोड, ब्लॉक III, नरीमन पाईंट, मुंबई-२१.
१४. वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.
१५. अवर सचिव, अर्थ-२, गृह विभाग.
१६. निवडनस्ती, पोल-३.

*****